३/५८

श्री

# आंग्ल-प्रभा

लेखक व प्रकाशक

इंदौर

३/५४

श्री

# आंग्ल--प्रभा.


लेखक व प्रकाशक

श्रीमति बालसरस्वति,

हिराबाई रामचंद्र गायकवाड,

पुणें.



मुद्रक

धोंडो काशिनाथ फडके,

ठाणें.

सन १९११.



प्रकाशकानें सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

ठाणें येथें अरुणोदय छापखान्यांत छापिलें.



## आर्या.

ग्रथि ह्या निबंधरूपीं नृपतीच्या सानशा चरीतास ।
घेईं मान्य करोनी सदया मी होय मंदमति ग्वास ॥ १ ॥



## आर्या.

विजयी राज्ञी मेरी, प्रसवे धन्या तुझी तुला जननी ।
नवनाथकीर्तिभानू पसरे ज्याची प्रभा विमल अवनीं ॥१॥

# अर्पण--पत्रिका.

हें लघुचरित्र लेखकानें

राजेसाहेब पंचम जार्ज

व

त्यांची पत्नी राणी मेरी,

यांस

अत्यंत प्रेमपुरस्सर आदरानें

अर्पण केलें असे.

श्रीशारदाप्रसन्न.

# नव कुसुम-माला.

## श्लोक.

अद्यापीहि जिचा पहा दुमदुमे लोकीं यशो-दुंदुभी ।
नक्षत्रें वसतीं तशीं सुचरितें जीं शोभतीं कीं नभीं ॥
जी राज्ञीपद शासितां सकलही संतुष्ट होती प्रजा ।
होशी पौत्र तिचा तुझ्यासम नसे बा भाग्यशाली दुजा॥१॥
नीति न्याय दया तशीच समता राज्यीं जिच्या नांदली ।
सौख्यें दुर्लभ ही प्रजा अनुदिनी सेवूनि आनंदली ॥
वात्सल्यांत जिची करील समता कोणी न ऐशी सती ।
अन्या या जगतीतलीं मज गमे राया वदूं हें किती ॥२॥

ज्याची भूतदया अगाध अतुला सर्वत्र विस्तारली ।
होती यास्तव भूवरीं चहुंकडे ती शांतता राहिली ॥
विद्वन्मानस हंसिका विहरते यत्कीर्ति रम्या अशी ।
सत्कीर्ति-प्रद तो पिता परम तें सद्भाग्य तूं भोगिशी ॥३॥
राणी सद्गुण शालिनी प्रिय तुझी **मेरी** असे सुंदरी ।
वाटे कीं मज ती रमा वसतसे प्रेमें तुझ्या मंदिरीं ॥
भाग्यें योग्य असा घडे नृपवरा दुग्धीं जशी शर्करा ।
प्रेमानंद सुधेस सेवुनि असे जेवीं पती इंदिरा ॥४॥
आनंदें सदनीं उभारुनि किती राया गुढ्या तोरणें ।
व्हाया उत्सव साजरा जन झटे हें कायसें सांगणें ॥
वाद्यें सुस्वर वाजती चहुं-कडे सर्वत्रही शोभती ।
नाना मंगल दीपिका उजळिल्या सर्वां गृहां भोंवतीं ॥५॥
ऐसे पूर्वज पुण्यशील तुमच्या पुण्यें तुह्मां लाधले ।
**श्रीमत् जार्ज नृपा** प्रजावन कराया जे सदा भागले ॥
ज्यांच्या आचरणांत जी सदयता जी दक्षता शुद्धता ।
जी न्यायप्रियता सदैव वसली येई न ती वर्णितां ॥६॥
हो तूं तत्सम शुद्ध भाव धरुनी राया प्रजा-रंजनीं ।
दावी थोर उदारता सरलता प्रेमें प्रजा-पालनीं ॥
दुःखें आर्य-महीस जीं असतिं तीं सारीं निवारी बरें ।
दारिद्र्यास निवारुनीं करि सुखी दीना जना सत्वरें ॥७॥

व्हाया लाभ सुखें सदा सुलभ तो विद्यामृताचा जना ।
लोकांच्या पुरवीं यथोचित नृपा चित्तांतल्या कामना ॥
ते ते यत्न करूनि सर्व जनता संतुष्ट राखी सदा ।
भोगी राज्य-सुखा अखंड मिळवी ती शर्मदा संपदा ॥८॥
दीर्घायुष्य सदैव चिंतित तुझें राहो प्रजा ती सुखीं ।
आनंदें चिरकाल सद्गुण-निधी राजा असो हा सुखी ॥
यांची संतति पुत्र-पौत्र-सहिता सौख्यांत नांदो सदा ।
आशीर्वाद असे प्रजाजन-मुखीं येवोत राया मुदा ॥९॥
राया ईशकृपें समुन्नत महा-राज्यासनीं बैससी ।
**राज्यारोहण** मंगलप्रद अशा कालीं कसा शोभसी ॥
याचें चित्र मनांत आणुनि तुझ्या त्या सद्गुणांची स्तुती ।
केली अल्प यथामती प्रिय असो ही त्वत्पदीं मन्मती ॥१०॥
पुण्यश्लोक युधिष्ठिरादि नृपती झाले यशस्वी जिथें ।
राया तूंहि तसाच होशिल अशी आशा अम्हांला तिथें ॥
वारंवार महोत्सवीं नृपतिच्या आनंद होवो जना ।
निष्ठा प्रेम सदा वसो दृढ अशी ईशा तुला प्रार्थना ॥११॥
श्रीमद्गायकवाड-वंश-जनिता मी रामचंद्रात्मजा ।
नामें मात्र हिरा नृपा नमितसें सप्रेम पादांबुजा ॥
राया मीं विनयें तुह्मांस सुमनें माला नवी अर्पिली ।
आहे ही तरि पाहिजे नृपवरा कंठीं सदा ठेविली ॥१२॥

# प्रस्तावना.

## श्लोक.

लक्ष्मीकांत अनंत हस्तकमळें देतां न मागे कदा ।
मागे स्वल्प तयासि कल्पतरु दे संतुष्ट व्हावें सदा ॥
निष्कामीं भजतां समर्पण करी मोक्षादिकीं संपदा ।
ऐसा स्वामि असोनि क्षुल्लकपदा कां इच्छिसी दुर्मदा॥१

या न्यायें परमेश्वराची अंतःकरणपूर्वक ज्यांनीं ज्यांनीं सेवा केली, त्यांच्यावर देव कशी पूर्ण कृपा करितो, हें सत्पुरुष व राजेरजवाडे यांच्या सामर्थ्या-वरून जाणलें पाहिजे. ईश्वराच्या आज्ञेवांचून ' झाडाचें पान देखील हालत नाहीं,' इतका अधिकार हल्लींचे सार्वभौम जे इंग्लंदचे राजे **पञ्चम जार्ज** व हिंदुस्थानचे बादशाह यांजकडे आला आहे. (एकीकडे राजे व दुसरीकडे बादशाह ह्मणजे जणूं काय इंग्लंड व इंडिया यांची ' हरिहर ' भेटच होय ). यांच्या कारकीर्दीचें वर्णन करण्याचा सुयोग आला हाही सुदिन होय. सुदिन हा सणासारखा आनंदकारक दिवस आहे. ह्मणून त्या दिवशीं रोजच्यापेक्षां विशेष ह्मणजे पक्वान्नें वगैरे करण्याची पद्धत आहे. त्याप्रमाणें श्रीमंत लोक उंचीं उंचीं पक्वानें करितात तर गरीब लोक गूळभात करून त्यांतच आनंद मानतात. सारांश, आनंदाचा दिवस

साजरा करितात. तद्वत् कै. **महाराणी साहेब व सातवे एडवर्ड** राजे आणि सांप्रत असणारे **पांचवे जार्ज** यांच्या कारकीर्दीचें वर्णन यथामति वर्णिलें आहे. पण भाषा मराठी असल्यामुळें ती सरकारास समजेल किंवा नाहीं, ही शंका आली; तेव्हां अंतःकरणांत निर्मल सूचना झाली कीं, इंग्रजी राज्यांत भिंतीला तोंड व कान हे अवयव आहेत. (भिंतींत जी तार घुसली ती तारच भिंतीचे कान होत. आणि भिंतींत पत्रें टाकण्याची जी पेटी आहे तेंच भिंतीचें तोंड होय.) तर असल्या सावयवी राज्यांत सरकारास मराठी भाषा कळणार नाहीं असें कसें होईल? कळेलच. असें समजल्याबरोबर आपोआप शंका दूर होऊन मनास फार समाधान वाटलें.

ईश्वराची भाषा कोणती आहे तें मात्र कळत नाहीं, परंतु अनेक जातींच्या मानवांची भाषा ईश्वर जाणतो. त्या अन्वयें इंग्रज सरकारची भाषा इंग्रजी आहे, तथापि संस्कृत, तामिळी, तेलंगी, कानडी, गुजराथी, हिंदुस्थानी, उर्दू, पारशी, मारवाडी इत्यादि अनेक भाषा सरकारास कळतात. तेव्हां मराठींत लिहिलेलें वर्णन त्यांस सहज समजेल अशी खात्री झाल्यावर आनंद झाला. असो.

परमदयाळू व न्यायी सरकारच्या राज्यांत अन्यायाचा कधींही प्रवेश न होवो अशी प्रार्थना आहे.

# श्री कै. मन्महाराणी साहेब, सातवे एडवर्ड, व हल्लींचे बादशाहा पंचम जार्ज यांच्या कारकीर्दी.

श्रीमती कै. **महाराणी साहेब** जगव्द्यापिनी **व्हिक्टोरिया** माता यांची सत्ता केवढी होती हें आतां सर्वांनां समजलेलेंच आहे. नवीन कळविलें पाहिजे असें कांहीं नाहीं. तथापि राज्यरूप वर्णनात्मक महासागरास स्तोत्ररूप नाल्याचा जलौघ मिळविण्याचा प्रयत्न केला आहे.

आपणास महाराणी साहेब प्रत्यक्ष दिसत नसत, तरी पोष्टकार्ड, पाकीट, तिकीट, स्ट्यांप व फोटो यांवरून त्यांस आपण पहात होतों. आणि पै, पैसा, चवली, पावली, रुपया, वगैरे नाण्यांवरही त्या आपणांस दिसत असत. आपण त्यांस जरी प्रत्यक्ष पाहिलें नाहीं तरी सर्वांची मानमान्यता त्यांच्या शक्तिवर अवलंबून होती यांत शंका नाहीं.

पहा! अत्तरदाणी असो, गुलाबदाणी असो, मच्छरदाणी असो, चिमणी असो, गिरणी असो कीं बरणी असो, त्यास महाराणी साहेबांचीं नाणीं असल्यावांचून कोणी पुसत नव्हतें. परशुरामपंत तात्या यांनीं एक श्लोक केलेला आहे तो असा:—

## श्लोक.

सौख्याची पूर्ण खाणी चिरसमय असो आमुची मुख्य राणी ।
आम्हांला हे शिराणी ह्मणुनि निजमुखें लोक गाऊत गाणीं ॥
जीची सर्वत्र ठाणीं सबळहि बघुनी जोडिती शत्रु पाणी ।
**व्हिक्टोरीया** निशाणी धरुनि चहुंकडे चालतीं शुद्ध नाणीं ॥

कंपनी सरकारानें जेव्हां सन १८५७ सालीं जाहिरनामा प्रसिध्द करून महाराणी साहेबांच्या नांवें इंग्रजी राज्य चालू केलें तेव्हां असें झालें कीं:—

## श्लोक.

**उमाळ्यावरी जेधवां सूर्य आला ।**
**पळाली निशा चंद्र निस्तेज झाला ॥**
**प्रकाशामुळें लोपल्या सर्व तारा ।**
**मिळेना कुठें ठाव त्या अंधकारा ॥**

याप्रमाणें यांचा प्रभाव प्रसरण पावतांच पूर्वींच्या राजांचें तेज ज्याच्या त्याच्या जवळच राहिलें ! साधारण कांचेची चिमणी घरांत लाविली असतां समयीचा प्रकाश समयीजवळ राहतो हें अनुभवसिद्ध आहे. ( मुली एकमेकींत उखाणें घालून ते सोडविण्यास सांगतात कीं 'ताटभर लाह्यांमध्यें एक रुपया ' हें गमतीचें रूपक आहे. तें असें. आकाशरूपीं ताटांत नक्षत्ररूपीं लाह्या भरलेल्या असून त्यांत रुपयारूपीं चंद्र आहे. तात्पर्य चंद्रापुढें नक्षत्रें लाह्यांप्रमाणें होत. ) असो.

महाराणी साहेबांच्या कारकीर्दींत सरस्वती, भागीरथी व अग्निनारायण वगैरे सकल देवता ऋध्दि सिध्दि होऊन हात जोडून नम्रपणें दास्यत्व करीत आहेत. तेथें आह्मां तीस कोटी प्रजेचा काय पाड? स्वत: मेंबर कंबर बांधून नंबर टिपूं लागल्यावर कारकुनास कोण पुसतो?

पूर्व-कालीं इकडे मुद्रणकला माहीत नसल्यामुळें साधुसंतांचीं चरित्रें, पुराणें व वेद इत्यादि ग्रंथ लिहिणें अवघड होई; ह्मणून विद्यादेवी मंत्ररूपानें पठणद्वारें गुप्त राहिली होती. पण अशा तऱ्हेनें कोंडून राहणें तिला न आवडून ह्मणा किंवा महाराणी साहेबांची कीर्ती वाढविण्याकरितां ह्मणा तिनें मंत्रासह यंत्रामध्यें उडी टाकिली. अर्थात् ती पालथी पडली. (टाइप उलटे असतात). तेव्हां तिला उठविल्यावर ह्मणजे छापून काढिल्यावर सुलटी होऊन बसली. अशा प्रकारचें आपलें सुंदर रूप तिनें बादशाहीण येण्यापूर्वीं हिंदुस्थानांत कोणासही दाखविलें नसावें. आणि आतां प्रत्यक्ष प्रगट होऊन खुशाल पुस्तक-रूपानें व वर्तमानपत्रद्वारें पृथ्विपर्यटन करीत आहे. यावरून असें वाटतें कीं, श्री स्वामिणी सद्गुणखनी महाराणी **व्हिक्टोरिया** ह्या येतील तेव्हांच आपलें खरें स्वरूप व्यक्त करावें असा तिनें निश्चय केला असावा.

आदि शक्ति जी वीज ती आज एक चीज बनली आहे. मांत्रिक जसें भुताला गाडग्यांत गाडून ठेवितात तसें हल्लींच्या शास्त्रज्ञांनीं विजेला बाटलींत कोंडून ठेविलें आहे. ह्मणून विजेचा दिवा मजेचा दिसूं लागला आहे.

अग्निनारायण व भागीरथी हीं सारथी होऊन आग-गाडीच्या रूपानें कितीही ओझीं लादलीं तरी हूं कां चूं न ह्मणतां मुकाट्यानें रोजच्यारोज पृथ्वीला प्रदक्षिणा घालीत आहेत. या प्रकारें जिच्या राज्यांत प्रमुख देवच चाकरी करीत आहेत तेथें क्षुल्लक देवतांची कथा काय?

आमचे लोक झाडाखालीं असलेल्या धोंड्याला ह्म-सोबा ह्मणून देवाप्रमाणें त्याची सेवा करितात. ती सेवा चुकली ह्मणजे तो ह्मशीच्या आचळांत दूध आटीव, मुलांना रडीव, बायकांच्या आंगांत संचार कर, अशा रीतीनें त्रास देऊन, नारळ, केळीं, अन्न, वगैरे हविर्भाग घेत असे. परंतु आतां इंजिनियरिंग खात्याचे द्वारें त्याला पकडून, त्याच्या अंगाला चुना फांसून, डांबर लावून, त्या ह्मसोबाला ' मैल ' असें नांव ठेविलें गेलें! तो मैल-रूपीं ह्मसोबा गुप्‌चुप् रस्त्यावर फुकट उभा राहून वाट-सरूनां तुह्मीं अमुक वाट चालून आलां व पुढें अमुक वाट राहिली असें दर्शवीत आहे. ह्मसोबाची ही स्थिती!

आतां बीरोबाकडे पाहूं! तोही पूजा स्वीकारून मजा मारीत होता. तो हल्लीं शेतांतून उपाशींच काम

करीत बसला आहे. त्याला 'सर्व्हेनंबर' नांव देऊन शेताची राखण करण्यास लाविलें आहे. कोणी शेताची जमीन मागें पुढें करून कमी जास्ती केल्यास तें त्यानें सरकारास कळविलें पाहिजे. कदाचित् तो बीरोबा इकडे तिकडे होईल ह्मणून त्याला व शेताला नकाशांत धरून ठेविलें आहे. कसा बंदोबस्त झाला? योजकस्तत्र दुर्लभः

हा नकाशा आकाशासारखा पसरला गेला आहे. झाडाचा नकाशा, शेताचा नकाशा, घराचा नकाशा, गांवाचा नकाशा, प्रांताचा नकाशा, देशाचा नकाशा, खंडाचा नकाशा, पृथ्वीचा नकाशा, याप्रमाणें नकाशे बनले आहेत. सर्वजग आकाशाखालीं आहे तर तें सरकारांनीं नकाशावर ठेविलें आहे.

पंचमहाभूतें यांचे स्वाधीन होऊन जणूं काय त्यांनीं व आमच्या सकल देवतांनीं **महाराणी** साहेबांच्या कारकीर्दीमध्यें आपापली करामत काय आहे ती दाखविण्याचा संकल्प केला होता कीं काय कोण जाणें. कारण एकोणिसाव्या व विसाव्या शतकांत विद्येच्या प्रत्येक भागाचा नंबर पहिला दिसतो. किती तऱ्हेचीं यंत्रें, किती तऱ्हेचे कारखानें, व किती तऱ्हेचा माल तयार होतो हें लेखनद्वारें कळविणें अशक्य झालें आहे. एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं—

## श्लोक.

तर्क व्याकरणादि नाटक–कलालंकार शास्त्रांतरीं ।
ज्यांचा खेळ असे विशाल झळके प्रज्ञा प्रभा अंतरीं ।
लीला प्राय समस्त प्राकृत–कथा वेदांत सिद्धांत ते ।
हातीं आमलका समान डुलती सांगों किती काय ते ॥

**मा. आ.**

जशीं मुलें एकाद्या लहानशा तलावांत नाव (होडी) टाकून खेळतात तद्वत् अति भयंकर असा समुद्र जणूं काय हत्तीच आहे. त्यास युक्तिरूप अंकुशानें वश करून त्यावर आगबोटरूपीं अंबारी चढवून त्यांतून मौजेनें खेळत खेळत हजारों कोंसांवरचा प्रवास सहज करतां यावा अशी योजना केली आहे. ही आगबोट हिंदुस्थानांतून फूं ह्मणून निघाली कीं ती थेट इंग्लंडास जाऊन दाखल होते. तेथून सूं ह्मणून सुटली कीं येथें दत्त ह्मणून हजर होते.

रेल्वेचा नकाशा पाहिला असतां असें दिसतें कीं, हिंदुस्थान देश म्हणजे केवळ तळहात व रेल्वेचे रूळ हे त्या हातावरील रेषा आणि ह्या तारायंत्राच्या तारा त्या हाताच्या जशा नाड्या आहेत. खरोखरच आगबोटी, आगगाड्या व तारायंत्रें यांच्या साह्यानें सर्व राज्य तळहात बनलें आहे. श्रीसूर्यनारायण जसा आपल्या किरणांच्या योगें साऱ्या भूगोलावरील गुण आकर्षण करितो, त्या अन्वयें **महाराणी साहेबांनीं**

आपल्या ह्यातींत सबंध राज्य तारायंत्राच्या दोऱ्यांनीं सांवरून धरिलें आहे. ह्मणून तार असलेल्या कोणत्याही तार आफीसांतून इंडियानें हाक मारिली कीं इंग्लंड 'ओ' ह्मणतें. यावरून एकंदर अफाट राज्य एका हांकेच्या टप्पावर आणून ठेविलें आहे असें म्हणण्यास काय प्रत्यवाय आहे? असो.

व्यवहारास लागणाऱ्या प्रत्येक वस्तु ह्मणजे लवंग घ्या, पलंग घ्या, पंचांग घ्या, नारिंग घ्या कीं रंग घ्या, तेथें कै. **महाराणी साहेबांचें** अंग म्हणजे साह्य असल्यावांचून कांहींसुद्धां मिळत नसे. हें पाहून असें वाटतें कीं—

**आर्या.**

भूजल तेज समीरख, रविशशिकाष्टादिकीं असे भरली।
स्थिरचर व्यापुनि अवघी, जी मलिकामा दशांगुलें उरली॥

ह्या मोरोपंतीं आर्येप्रमाणें त्या सर्वव्यापी होत्या ह्यांत शंका नाहीं. त्या अखंड भरतखंड व्यापून इंग्लंड येथें राहून तेथूनच आमचीं गाऱ्हाणीं ऐकून न्यायरूपीं हातानें सांभाळ करीत असत. त्यांनीं पैसारूपीं पुष्पें उत्पन्न करून प्रजेच्या प्रपंचांत चालू केलीं. या पुष्पास पूजेच्यावेळीं 'सुवर्णपुष्प दक्षिणा' असें ह्मणत असतात. तर तें सुवर्णपुष्प कसें झालें याविषयीं रूपक—

## रूपक.

टांकसाळ रूपीं उपवनांत
सत्ता रूपीं वृक्ष उगवून त्यास
नोटा रूपीं पानें फुटून नंतर
पै, पैसा रूपीं तांबडीं पुष्पें आलीं मग
चवली, पावली, रुपयारूपीं पांढरीं पुष्पें दिसूं लागलीं व
गिनी—पौंड रूपीं पिंवळीं पुष्पें उमललीं.

सदरहू उपवनांतील फूल जवळ नसेल तर माल व हमाल मिळणें मुष्कील आहे व मग त्याचे हाल काय विचारावे ? हीं पुष्पें मिळविण्याकरितां प्रजाजन अहर्निश झटत असतात. तेव्हां व्यवहार सुरक्षित चालतो. त्या व्यवहारांत सदरहू पुष्पांस बरींच नांवें दिलेलीं आहेत. त्यांची नामावळी येणेंप्रमाणें :—धन, वेतन, कांचन, कामिशन, दर, कर, पगार, नफा, फायदा, फी, फाळा, सारा, बिदागी, नाणें, मजुरी, संभावना, दक्षिणा, किंमत, मोल, भाव, धारण, पट्टी, वर्गणी, मुद्दल, व्याज, रक्कम, दाम, दंड, फंड, हुंडा, हुंडी व मनिआर्डर वगैरे.

सुवर्ण-पुष्पांप्रमाणें सुंदर कमल-पुष्पेंही आहेत. अनेक रंगांचीं सुरेख अशीं राजाचीं मुखकमलें असणारीं पोष्टाचीं तिकिटें पाहून जणूं काय आतांच ताजी व टवटवीत नानारंगीं कमलें उमललीं आहेत असें वाटून मनाला आल्हाद होतो.

सदरहू कमलें व फुलें यांचे द्वारें रात्रंदिवस प्रपंचास उपयोगीं पडणारी सार्वभौम राजक्रीडा मोठ्या मौजेनें सर्वकाल सुरू आहे. पत्त्यांच्या खेळाच्या ठिकाणीं कार्ड-पाकिटांचा खेळ आहे. या पत्त्याच्या खेळांत चौक, एक्का, अशीं नांवें असतात, तर कार्ड-पाकिटांच्या जागीं अमुक मनुष्य, तमुक गांव, असें नांव असतें. 'बिझिकचे' खेळांत मार्क असतात तर नोटीचे खेळांत आंकडे आहेत (अमुक अमुक रुपयांची नोट), तेच मार्क होत. या रीतीनें खेळ चालला आहे. जो खेळ राजमान्य तो जगमान्य सहज होतो. कांहीं लोक प्रामिसरी नोटीला परमेश्वरी नोट ह्मणतात. तेंही ह्मणणें बरोबर आहे. प्रामिस ह्मणजे वचन. मग वचनाप्रमाणें वागणारा परमेश्वर कां नव्हे ? अस्तु.

भाद्रपदमासीं हरितालिकेचें प्रथम दिवशीं पूजन होऊन तिचें विसर्जन झाल्यावर दुसरे दिवशीं श्री गजानन महाराजांचें आगमन होतें. त्या अन्वयें **महाराणी** साहेबांच्या पश्चात **सातवे एडवर्ड** सिंहासनारूढ झाले. त्यांच्या मागून आतां **पांचवे जार्ज** हे सिंहासनाधिपती झाले आहेत. याविषयीं रूपक:—

## रूपक.

| | | |
|---|---|---|
| महाराणी साहेब | रूपीं | हरितालिका मातेनें |
| राज्य | रूपीं | महालांत बसून |

| | | |
|---|---|---|
| प्रजा | रूपीं | भक्तांस |
| कृपा | रूपीं | प्रसाद देऊन |
| सद्‌गुण | रूपीं | मस्तकावर |
| कीर्ति | रूपीं | किरीट व |
| शाबासकी | रूपीं | शालू परिधान केला होता तद्वत् हल्लीं राजे महाराजांनीं किरीट व शालू सह |
| औदार्य | रूपीं | आभरण धारण करावें आणि |

विचार रूपीं कृपादृष्टी ठेवून कष्टी झालेल्या गरीब प्रजेचें पालन करून प्रजेकडून दुवा रूपीं दुशाला ग्रहण करावी अशी विनयपूर्वक प्रार्थना आहे.

# सातवे एडवर्ड बादशाह.

**राजे सातवे एडवर्ड महाराजांच्या** हातांत लाडवाप्रमाणें जो गोळा दिसतो तो लाडू नसून हिंदुस्थान—देश [ भूगोल ] रबरी चेंडूप्रमाणें झेलून धरिला आहे. असा त्या गोळ्याचा भावार्थ आहे. अशा रीतीनें अखिल देशरूपीं गोल, कायद्याच्या रुमालांत गुंडाळून ठेविला आहे. ह्मणून त्यांच्या राज्यांत असा दरारा बसला आहे कीं, कराराप्रमाणें भरारा कामें आटोपलींच पाहिजेत. इतक्या बंदोबस्ताचें करारी बाण्याचें सूक्ष्मदर्शक यंत्रीं राज्यसूत्र असल्यामुळें एकादी गोष्ट सप्त पातालांत गुप्त असली तरी ती प्राप्त होते. यास्तव सरकारानें ' हूं ' ह्मटल्यावर ' कूं ' म्हणजे कांकूं करणार कोण ? एका रात्रींत सर्व राज्यांत जनसंख्या मोजावयाची म्हटली तरी तयार ! हाच तो ' हुं कुं. ' एकदां आर्डर सुटल्यावर मग कसची आरडाओरड आली ? हुकुमासरशीं सारीं कामें न बोलतां गती दिलेल्या यंत्रासारखीं आपोआप चालूं लागतात. हुकूम म्हणावा तर हा हुकूम, ही दहशत आणि हें सामर्थ्य.

मुसलमानी राज्य झालें तेव्हां डोईस गुंडाळावयाच्या भल्या मोठ्या पटक्यांत प्रजा आवरण्याचा बादशहानें आव घातला; पण त्यावेळीं प्रजा पानावर वाढिलेल्या साराप्रमाणें अनावर झाली होती. पुढें पेशवाईंत व मराठेशाहींत मोठ्या पांटीएवढ्या पागोट्यामध्यें प्रजा सांठवून ठेवण्याचा प्रयत्न झाला. तरी ती प्रजा ताटांत वाढलेल्या कढीप्रमाणें पसरल्यामुळें ती आवरतां आली नाहीं.

कंपनी-राज्य सुरू झाल्यानंतर इंग्रजांनीं आंटीव खिरीप्रमाणें प्रजा वाटी-रूपीं टोपींत सांठवून ठेविली आहे. हा लहान सहान पराक्रम नाहीं. ज्यांच्या राज्यांत तेजःपुंज अशी विजेसारखी अगम्य शक्ति हुकुमांत राहिली गेली आहे, तेथें सकल जातींच्या व धर्मांच्या प्रजेचा पाऱ्याप्रमाणें एकजीव करून ती ताब्यांत ठेविल्यास आश्चर्य तें कोणतें? ज्यांना समुद्रांत पोहतां येतें ते नदींत पोहूं शकणार नाहींत काय?

हत्ती हा बलाढ्य व सर्वांत मोठा म्हणून कीं काय त्याला पूर्वकालीन राजे पाळीत असत. पण त्याहून दिसण्यांत अतिशय लहान असून महापराक्रमी असा एक आहे असें कंपनी सरकारानें प्रारंभींच दर्शविलें आहे. तें हें कीं:—

एका बाजूस चपल सिंह व दुसरे बाजूस सिंहासारखा चलाख असा पराक्रमी घोड्याच्या आकाराचा शरभ

नांवाचा प्राणी दाखविला आहे. (पोष्ट कार्डावर पहा!) या चिन्हाप्रमाणें आंग्लप्रभु आहेत. सिंह व शरभ या दोहोंमध्यें दिसणारें वर्तुळ हें भूमंडळ आहे. अशा भूमंडळास खंड ही संज्ञा आहे. तीं खंडें ह्मणजे एशिया खंड, युरोप खंड, व आफ्रिका खंड. इत्यादी खंडांवर आंग्लप्रभूंचें वर्चस्व चमकत आहे. एकेक खंड जसें सुपारीचें खंड, किंवा शेवखंड अगर इक्षुदंड ह्या पदार्थाप्रमाणें हस्तगत आहे. आईबाप किंवा एक बायको, एक मूल अथवा एक बंधु यांची घरांत व्यवस्था होणें किती कठीण जातें आणि आंग्लप्रभु खंडांचींखंडें कह्यांत ठेवून अफाट राष्ट्रांची व्यवस्था कशी ठेवित असतील ती असो.

आमच्या लोकांकडून त्या त्या गांवची नुसती म्युनिसिपालिटी व्यवस्थित रीतीनें सांभाळणें होत नाहीं. अर्थांत आंग्लप्रभूंचें ज्ञान आणि कर्तबगारी पाहून धन्यता कां वाटूं नये?

आह्मीं फक्त नारळाला महाफल समजतों पण याहून महाफल आहे तें निराळेंच. त्याचें नांव क्षेत्रफल. (क्षेत्रफळाचा अर्थ जमीन). क्षेत्रफळ अर्थांत पृथ्वी, इच्याहून महाफल कोणतें?

भूर्भूमि रचलानंता रसा विश्वंभरा स्थिरा।
धरा धरित्री धरणिः क्षोणिर्ज्या काश्यपी क्षिती॥

अशा अनेक नामाच्या पृथ्वीरूपीं महाफलाचा जो भोक्ता तो नृपती. नृ ह्मणजे नर, व पति म्हणजे यजमान. अर्थात सर्व मनुष्यांवर जो यजमानपणा चालवितो त्यास नृपती म्हणतात. त्याचेंच नांव राजा. आतां नरांमध्यें सिंहासारखा पराक्रमी असणारा नर-श्रेष्ठ तो नृसिंह होय. नृसिंह तेथें लक्ष्मी हा न्याय आहे.

श्री लक्ष्मी व श्री सरस्वती यांचें बहुधा पटत नसतें म्हणतात. पण येथें त्यांचा उलट प्रकार दिसतो, म्हणजे त्या दोघीजणीं गोडीगुलाबीनें (नियमितपणा व कर्तृत्वासहित चातुर्य असल्यामुळें त्यांचें तेजस्वी वर्चस्व पाहून कीं काय? ) आंग्लप्रभूच्या दरबारांत सदैव संतोषानें एकीकडे नांदून सख्यत्व प्रकट करीत आहेत. यास्तव ' समर्थांचे घरीं ऋद्धि सिद्धि पाणी भरी ' म्हणतात तें खोटें नाहीं.

भोंवरा किंवा भिंगरी कांट्यावर असावी त्याप्रमाणें इंग्रजांनीं सारें राज्य कांट्यावर ठेविलें आहे. तें असें कीं, अमुक काम अमुक वेळेला करावयाचें म्हणजे किती वाजले हें पाहून तदनुसार वागावयाचें. अमुक वाजले हें सांगण्यास घड्याळांत कांटा आहे. दिशा दाखविण्यास होकायंत्रांत कांटा आहे. अमुक तोळे वजन हें समजण्यास तराजूंत कांटा आहे. सोनें, रुपें, केशर, कस्तुरी ह्यांप्रमाणें लांकडें सुद्धां कांट्यावर आलीं. अशींच सगळीं कामें कांटेतोल आहेत.

अशा प्रकारें सर्व गोष्टींत सरकारास उत्तम माप ( लेव्हल ) सांपडलें आहे. देश किती, घरें कितीं, जनावरें कितीं, याचें माप ह्मणजे हिशेब मिळेल. पण हवेंत उष्णता किती, थंडी किती, पाऊस किती हेंही माप पकडून ठेविलें आहे. झाडें कितीं हें समजण्यास झाडांवर नंबर, गाडीवर नंबर, घोड्यावर नंबर, चाकरावर नंबर, अशा तऱ्हेचें माप पूर्वीच्या कोणाही राजांनां मिळालें नसेल. बादशाही आहे पण बेबंद किंवा झोटिंग पादशाही नाहीं. घर कोठें व कसें आहे हें जाणण्यास नकाशा आहे. कितवें घर हें समजण्यास नंबर आहे. घराच्या मालकास कळविण्यास नोटीस आहे. नकाशा, नंबर, नोटीस याशिवाय आपल्या राज्यांत काय काय चाललें आहे हें सांगण्यास तार व पोष्ट आहे. जेवढें राज्य त्यांच्या ताब्यांत आहे त्या अखंड राज्याची बातमी रोजच्यारोज राजाला समजते. किल्ला बांधून त्यांत भुयारें करून बंदोबस्तानें ह्मणून जुनें राजे राज्य करीत असत; परंतु इंग्रजी राज्यांत किल्यांचें व भुयारांचें कामच उरलेलें नाहीं. जेथें अविच्छिन्न बारा तास नव्हे चोवीस तास किंवा अष्टौप्रहर सूर्याची प्रभा उज्वल आहे अशा दिग्भागांत राज्य करीत आहेत. राजा व राज्य हीं आंधेरांत नाहींत. तेजःपुंज अशा प्रकाशांत जागृत आहेत.

ह्मणूनच "इंग्रजी राज्यांत कोठेंही सूर्य मावळत नाहीं अशी ह्मण आहे." असो.

आंग्लभाषेवर प्रजेचें इतकें कांहीं अप्रतिम प्रेम आहे कीं, कोणत्याही जातीच्या भाषेंत आबालवृद्ध सहज उमेदीनें इंग्रजी शब्द वापरतात, याचें कारण ती भाषाच फार मोहक आहे. प्रत्येक जातीला वाटतें कीं, ही आपलीच भाषा आहे. उदाहरणार्थः— हें 'वाच' एकदां 'स्लो' व एकदां 'फास्ट' चालतें. 'एग्झ्याक्ट' 'टाइम' समजत नाहीं. तें 'वाचमेकरकडे' 'रिपेरीला' दिलें पाहिजे. विद्यार्थी– 'न्यूजपेपरमध्यें', 'रिझल्ट' आला नाहीं. 'पास' झालों तर 'प्राइझ' मिळेल. 'ड्रॉइंगमध्यें' 'फुल' 'मार्क' आहेत.

कोणी गमतीनें, कोणी मौजेनें, कोणी सहज लीलेनें, कोणास संवय झाली म्हणून तर कोणी अभ्यास करावा म्हणून इंग्रजी बोलतात. सारांश, त्या भाषेंत माधूर्य व गांभीर्य ओतप्रोत भरलेलें आहे. ह्यामुळें सर्व नद्या समुद्रास जाऊन मिळतात, तद्वत सर्व जातींच्या भाषा इंग्रजी भाषेस जाऊन मिळाल्यां आहेत. त्या इंग्रजी शद्बावांचून बोलतांच येत नाहींत. सागरास नदी मिळाल्यावर हें अमुक नदीचें पाणी आहे हें जसें ओळखितां येत नाहीं त्याप्रमाणें सर्व भाषांतून इंग्रजी शब्द असले तरी ते त्या त्या भाषेंतील शब्द जाहले आहेत.

इंग्रजी वांचून मराठी भाषेंत इतर कानडी, तेलंगी, गुजराथी, वगैरे भाषेपैकीं एकादा शब्द आला तर तो वाईट दिसतो. तेव्हां आपण हंसतों. तसें इंग्रजी भाषेविषयीं नाहीं. भूतलावर बहुतेक जितक्या म्हणून भाषा आहेत त्या सर्व भाषेंत इंग्रजी शब्द जडावाप्रमाणें सुशोभित दिसतो. अशा दैदीप्यमान सर्वतोमुखीं व्याप्य भाषेचें वर्णन कोण करूं शकणार? सदर आंग्ल प्रभूंचें राज्य हें एक विश्वरूपच आहे. अर्थात वाग्देवताही तशीच असणार! तिचा अंत अनंत जाणें. जों जों विचार करावा तों तों सरकारच्या सामर्थ्याचें व व्यवस्थेचें सानंदाश्चर्य वाटून मति कुंठित होते.

## महत्पदक.

इंडिया हें पदक असून त्याला सिलोन हा लोलक लटकविलेला आहे. ह्या पदकांत पोष्ट खातें, फारेष्टखातें, रेव्हिन्यू खातें वगैरे खातीं रूपीं मोतीं ओंविलेलीं आहेत. असा कंठा **एडवर्ड** महाराजांच्या कंठांत झळकत होता तो यापुढें **पञ्चम जार्ज** बादशहांचे कंठांत झळकत राहील. ह्या पदकांत इतका उत्तम गुण आहे कीं, हें बादशहास सालीना सुमोरें १,०८,५०,१९,६३० अब्जावर उत्पन्न देत आहे. हें फक्त हिंदुस्थानचें ऐश्वर्य आहे. या-

खेरीज इतर खंडांचें अगणित ऐश्वर्य असेल तें निराळेंच. असें अपरिमित ऐश्वर्य असूनही इतका साधेपणा आहे कीं, अंगांत कोट, पायांत बूट, खिशांत नोट असा थाट आहे.

कोणीकडे राजा, कोणीकडे देश, कोणीकडे प्रजा, अर्थाअर्थी संबंध नाहीं. अशा किती तरी अंतरावरून आंग्लप्रभू राज्यशकट चालवीत आहेत. हें सामर्थ्य पाहिलें असतां कळेल कीं, परमेश्वराच्या खालोखाल त्याच्याच तोडीचें सामर्थ्य यांच्यांत आहे, (भूमि नमत, जलधि हटत, नभहि वांकत) असें ह्मणण्यास हरकत नाहीं. मनुष्यांमध्यें एवढें अचाट सामर्थ्य असूं शकतें तर प्रत्यक्ष परमेश्वराचें सामर्थ्य केवढें असेल !

असा पराक्रम जेथें वास करीत आहे त्या "ना विष्णुःपृथ्वीपतिः" रूपीं सरकारास सविनय प्रार्थना आहे कीं:—

## श्लोक.

**प्रजा हाच कीं वत्स भू-धेनुकेचा ।**
**नृपा तूं करी फार सांभाळ याचा ॥**
**स्ववत्साचिया जाण वात्सल्य योगें ।**
**अभीष्टार्थ हे भूमि देईल वेगें ॥**

**वा. पं.**

## रहा—दोहरे वजा.

अयु! राज राजा तु सबसे बडा है।
तद्बीर तुह्मारी ये रियासत् मिली है॥१॥
जमीयत् जमीका तु खाविंद हुवा है।
खुदाके इनायतसे मालीक बना है॥२॥
सुनो बादशाहा **जार्ज** अर्जि मेरी है।
होके कदंबोस कहेना जरा है॥३॥
जैसा के वालीद् तुमारे किये है।
परवेश करना सभीका तुझे है॥४॥
नेकदार दरबार तुह्मारा है पाश्शा।
येहि साथ आवे तुह्मारे हमेशा॥५॥
बहुदूर ह्यांसे तुह्मारा शहर है।
रहिम दिलसे लेना हमारी खबर है॥६॥
तुमारा नाम अफताब रोशन हुवा है।
होना हयादूंनि निहायत खुषी है॥७॥
करोगे मुझे माफ ऐसी उमेद है।
करो जानके मान हिराका सवाल है॥८॥
लेना शाहिन शाहा तुम् मेरा सलाम है।
नही काम करता ये मेरा कलाम है॥९॥